# Library & Information Centre

## GIT in NEWS

**TarunBharat 23-03-2016**

# जीआयटी कॉलेजला अजिंक्यपद



बेळगाव : प्रमुख पाहुणे डॉ. ए. एस. देशपांडे, प्रा. आर. श्रीधर यांच्या हस्ते गोगटे तांत्रिक महाविद्यालयाचा कर्णधार सुमीत वेलिंग चषक स्वीकारताना. शेजारी क्रीडा प्राध्यापक क्रांती कुरणकर.


क्रीडा प्रतिनिधी
बेळगाव


विश्वेश्वरय्या तांत्रिक विद्यापीठाच्या आंतरतांत्रिक महाविद्यालयीन लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेत गोगटे तांत्रिक महाविद्यालयाने अजिंक्यपद पटकाविले.

व्हीटीयूच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात बेळगावच्या गोगटे तांत्रिक महाविद्यालयाने बीव्हीबी तांत्रिक महाविद्यालयावर १२६ धावांनी दणदणीत विजय प्राप्त केला. २५ धावात ५ बळी घेणारा गोगटे महाविद्यालयाचा प्रशांत होनगेकर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. बक्षीस वितरण समारंभात प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. ए. एस. देशपांडे, प्रा. आर. श्रीधर, क्रीडा प्राध्यापक क्रांती कुरणकर यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना चषक देऊन गौरविण्यात आले.



प्रशांत होनगेकर

**संक्षिप्त धावफलक – जीआयटी महाविद्यालय :** ३० षटकात ९ बाद २४० धावा. (सुमित वेलिंग ५०, कैफ जमादार ४३, कैताज कोल्हापुरे ३५ धावा, बीव्हीबी महाविद्यालयातर्फे विनोद हेगडे व पवन पी. प्रत्येकी २ बळी, प्रताप के., केतन पाटील, कुणाल प्रत्येकी एक बळी).

**बीव्हीबी महाविद्यालय :** २० षटकात सर्वबाद ११४ धावा (प्रताप के. ३१ धावा, जीआयटी महाविद्यालयतर्फे प्रशांत होनगेकर ५, शुभम हेरेकर २, तेजस पवार व नोएल डिमेलो प्रत्येकी एक बळी).